ನಾನು ಈ ಬಗ್ಗೆ ತಿಳಿಸಿದ ವಿಷಯವನ್ನು ತಮ್ಮ ಗಮನಕ್ಕೆ ತರಲು ತಿರಸ್ಕರಿಸುವುದಕ್ಕೆ ತಿಳಿಸುವುದು. ನಾನು ಮಡಿಕೇರಿಯವರು ಬೆಂಬಲಿಗರೂ ಬಹುಜನ ನನ್ನ ಬಂದು ಬಳಗದ್ದು ಹೀಗೆ ಬಂದವರು ಅದು ಬಂದವರಿಗೆ ಸಾಧು ಪಿಜ್ಜಿಗೆ ಹೋಗಿ ಧನವನ್ನು ಪಾಲಿಸಿದರು, ಬೆಂಬಲಿಗರನ್ನು ಮಿಶ್ರ ಹಿಂಸ್ಯ ಬಗ್ಗೆ ತಿಳಿಸಿದರು ಎಂದು ಹೀಗೆ ಅದು ಬಂದವರು. ಅವಕ್ಕೆ ನಾನು ಬಿಟ್ಟಿರುವುದು ಬಹಳ ಇಷ್ಟೆಂದು ನನಗೆ ಬಹಳ ಸಂತೋಷವಾಯಿತು ಮತ್ತು ನಾನು ತಿಳಿಸಿದ್ದರಲ್ಲಿ ಬಹಳ ಬೇಸರಿಸಿಕೊಳ್ಳದೆ ಬಂದು ಬಳಿಕ ಹೀಗೆ ಮಾಡಿದರೆ ಬೇಡವೆಂದು ಬೇಡಿಕೊಂಡು ಹೀಗೆ ಮಾಡಿದರೆ ಬಂದು ಹೀಗೆ ಬಂದವರಿಗ

117

ತಮ್ಮ ನಿಷ್ಠೆಯನ್ನು ಇವನ್ನು ಕಿರುಬೆರಳಿನಲ್ಲಿ ಬಾಚಿಕೊಳ್ಳಲು
ಕಾಗದಗಳ ರಾಜ್ಯದಲ್ಲಿ ಕಂಡುಬರುವ ನೀಲಿಚಿತ್ರಗಳು ಬಾಗಿಲಿಗಾಗಿ ಬರುವ
ಮಕ್ಕಳಿಗೆ ಕಿಚ್ಚನ್ನು ಕಡ ಬಾಡಬಹುದು ಎಂದರೆ ಎಲ್ಲಾ
ಕಲೆಕ್ಟರ್ ಗಳಿಗೆ ಸಾಕಷ್ಟು ಬಾಡಿಗೆಯನ್ನು ಪಡೆಯುವ ಭಾಗವಿ
ಬಟ್ಟೆಯನ್ನು ನೀಲಿಚಿತ್ರಗಳು ಅಲ್ಲಿ ತೀರ್ಮಾನ
ನಿಕ್ಷೇಪಣಾರ ಇಲ್ಲಿಂದ ಇಬ್ಬನಿಗಳಾಗಿ ನಡೆ
ಯಾರು ಬಾಡಿಕೆಯಂತೆ ಕಿರಾಣಿಯ ಬಿಗಿಯಲು ಪಟ್ಟಣದಲ್ಲಿ
ಬೈಸಿಕಲ್ಲಿನಲ್ಲಿ ಕೊಂಡಿಯಾಗುವಂತೆ ಬಟ್ಟೆಯಿಂದ
ಬಾಟಲಿ ಇವನ್ನು ಬಿಗಿದ ಆಕಾಶಕ್ಕೆ ತಿರುಗಿದ ನಂತರ.
ಎಲ್ಲರಲ್ಲಿ ಕಿರುಚಿದ ಕೈ

ತಮ್ಮ ನಂಬುಗನ್ನ

Elisa Mirdanna

(K.S Mirdanna)

ಈ ಪತ್ರವನ್ನು ತಕ್ಷಣವೇ ತಿರುಗಾಟದಲ್ಲಿರುವ ಎಲ್ಲಾ
ಪಟ್ಟಣಿಗರಿಗೆ ಬಾಬಾಜಿಯವರಿಗೆ ರವಾನಿಸಿ.

1. ಪೆಟ್ಟಿಗೆಗಳ ನಿಂಬೆಗಿಂತ KHI ಮಿಲಿಯನ್ಸ್ಗಳು
2. ಹಿಟ್ಟು ಕೆಳಗೆ ಬಿಳಿಯ ಬಣ್ಣದಿಂದ ಬಳಸಿದ
3. ಆಭರಣಗಳಲ್ಲಿ ನಿಂಬೆಗಿಂತ ಬಣ್ಣದಿಂದ ಸುಲಭ.
4. ಪೆಟ್ಟಿಗೆಗಳ MLA ಯಿಂದ ಬಣ್ಣದಿಂದ ಬಳಸಿದ

ತಿರುಗಾಟದಲ್ಲಿ ಇವರಿಂದ ಬಣ್ಣದಿಂದ ಕಿರುಬೆರಳಿಗೆ
ಬಳಸಬಹುದು. ಕೆಲವೊಂದು ಇವರಿಂದ ಬಣ್ಣದಿಂದ
ಕಿರುಬೆರಳಿಗೆ ಕಿರುಬೆರಳಿಗೆ ಬಳಸಿದರೆ ಬಣ್ಣದಿಂದ
ಬಣ್ಣದಿಂದ ಬಳಸಿದರೆ.

ಸ್ಥಾಪನೆ ೧೯೫೦ ಫೋನ್ ೨೭

ಒಕ್ಕಲುತನದ ಹುಟ್ಟುವಳಿಯ ಪೇಟೆಯ ಸಮಿತಿ, ಸಂಕೇಶ್ವರ.

ತಾ॥ ಹುಕ್ಕೇರಿ.] (ರಾಣಿ ಚನ್ನಮ್ಮಾ ಮಾರ್ಕೆಟ ಯಾರ್ಡ) [ಜಿ. ಬೆಳಗಾವಿ.

ಪತ್ರಾಂಕ ನಂ. SKR-MISC/ 585 OF 1975-76. ದಿನಾಂಕ 20 NOV 1975

118

To,

The Chief Medical Officer,
Karnataka Health Institute,
CHATAFRABHA.

Sir,

I am enclosing herewith a Condolance Resolution, for the sad demise of Dr.N.S.Hardikar, Sevadal Sanvstapak, passed in the meeting of the Agril.Produce Market Committee, Sankeshwar held on 10-9-1975, praying the Almighty Let his Soul be rest in the eternal peace.

Yours faithfully,

(Malhargouda S.Patil)
Chairman.

Cbh:

ಒಕ್ಕಲುತನದ ಹುಟುವಳಿಂದ ಪೇಟಿಂದ ಸಮಿತಿ, ಸಂಕೇಶ್ವರ ಇದರ
ದಿನಾಂಕ 6— 10 — 9 — 1975 ರಂದು ಕೂಡಿದ ಸಭೆಯಲ್ಲಿ ಕೈ—ಕೊಂಡ
ದು:ಖಸೂಚಕದ ಗೊತ್ತುವಳಿಂದ ನಕಲು.

ನೀವಾದಳ ಸಂಸ್ಥಾಪಕ ನಾಡಿನ ಹಿರಿಂದ ನಾಂದುಕರಾದ ಡಾ: ಎನ. ಎಸ.
ಹರ್ಡೀಕರ ಇವರು ದಿನಾಂಕ 26—8—1975 ರಂದು ಬೆಳಿಗ್ಗೆ 7—30 ಕ್ಕೆ ಅಕಸ್ಮಿಕವಾಗಿ
ನಿಧನ ಹೊಂದಿದರು, ಅವರ ನಿಧನದಿಂದ ಭಾರತ ದೇಶದ ಒಬ್ಬ ಅಮೂಲ್ಯ ವ್ಯಕ್ತಿತ್ವವನ್ನು
ಕಳೆದುಕೊಂಡಂತಾಯಿತು, ಮೃತರ ಆತ್ಮಕ್ಕೆ ದೇವರು ಚಿರಶಾಂತಿಂದುನಿಲ್ಲಲಿಂದು
ಸಮಿತಿಂದು ಸದಸ್ಯರೂ ಹಾಗೂ ಕಾರ್ಯದರ್ಶಿಂದುವರು ಎರಡು ನಿಮಿಷ ಮೌನವನ್ನಾಚರಿಸಿ
ಶ್ರದ್ಧಾಂಜಲಿಂದುನ್ನು ಅರ್ಪಿಸಲಾಯಿತು..

ಸಂಕೇಶ್ವರ.

ದಿನಾಂಕ: 10 — 9 — 1975.

ಸಹಿ)—
ಸೆಕ್ರೇಟರಿ
ಒಕ್ಕಲುತನದ ಹುಟುವಳಿಂದ ಪೇಟಿ ಸಮಿತಿ
ಸಂಕೇಶ್ವರ.

ಸಹಿ:—
ಡೀ ಆರ ಪವನ್ನ,
ಒಕ್ಕಲುತನದ ಹುಟುವಳಿಂದ ಪೇಟಿ ಸಮಿತಿ
ಸಂಕೇಶ್ವರ.

ನ ಕ ಲು

ಕಾಂರ್ಯದರ್ಶಿ
ಒಕ್ಕಲುತನದ ಹುಟುವಳಿ ಪೇಟಿಂದು
ಸಮಿತಿ, ಸಂಕೇಶ್ವರ.

ಜಿಜಿ:

FILE No - 103
1914 — 1915

PAGE No 1 To 45

२८ जुलै १९१४

अमेरिकेंत जाणाऱ्यांसाठीं माहिती

(ले. नारायण सुलराव हार्डीकर, अनार्बर-अमेरिका)

परदेशीं जावयाचें म्हटलें म्हणजे तेथील निरनिराळ्या गोष्टींविषयीं अनेक प्रश्न उपस्थित होतात. माहिती मिळवायची तर कोणास लिहावें, लिहिले तर ज्याच्या त्याच्या परिस्थितीप्रमाणें सर्व माहिती मिळतेच असें नाहीं, करिता अमेरिकासंबंधाने कांहीं ठोकळ माहिती प्रश्नोत्तररूपानें देण्याचा प्रयत्न करीत आहे

प्रश्न १:- हिंदुस्थानांत मुंबईमॅट्रिकपर्यंत शिकलेला विद्यार्थी अमेरिकेंत गेला असतां तेथील विश्वविद्यालयांत त्याचा सहज प्रवेश होऊ शकतो आणि तेथील शास्त्रीय अगर वाङ्मयात्मक अभ्यासक्रम चांगल्या तऱ्हेने पार पाडू शकतो असें म्हणतात, हें खरें आहे काय?

उत्तर:- आपल्या इकडील मुंबईमॅट्रिकच्या विद्यार्थ्यांना असो किंवा ग्रॅज्युएटसना असो, इकडील -अर्थात चांगल्या- विश्वविद्यालयांमध्ें प्रवेश मिळण्यापासून अभ्यास करावा लागतो याचे कारण इकडील अभ्यासक्रम हे होय आपल्या इकडे जी विद्या देण्यांत येते ती निव्वळ पोटभर, विद्या आहे. त्या विद्येपासून राष्ट्राला अगर जनतेला कोणताही उपयोग होत नाहीं आपला अभ्यास केवळ करकून तयार करण्याच्या लायकीचा असल्यामुळे त्यांची व अमेरिकेतील अभ्यासक्रमाची तुलना करतां येत नाहीं विश्वविद्यालयात प्रवेश करण्यापूर्वी इकडील 'हायस्कूलस' मधून इंग्रजींत फिजिक्स, केमिस्ट्री, ट्रिगॉनमेट्री, जॉमेट्री कोरे सृष्टिशास्त्रे शिकविली जातात. हे विषय विश्वविद्यालयात उच्च ट्रेनिंगसाठी पुनः शिकविले जात नाहींत इलेक्ट्रिकल इंजिनियरिंग, सायन्स अथवा ॲग्रिकल्चर किंवा डॉक्टरी याचा अभ्यास करणाऱ्यांना हे विषय अत्यंत जरूर आहेत या विषयांशिवाय पुढे पाऊल टाकता येत नाहीं कारण, हे विषय विश्वविद्यालयांतील शिक्षणाच्या शास्त्रीय शाखेच्या शिक्षणाचा पाया होत. आपल्या इकडील खुद्द डॉक्टरासच इकडील चांगल्या विश्वविद्यालयांत प्रवेश करून घेणें जड जातें. मी माझा हिंदुस्थानातील वैद्यकीचा अभ्यास संपविला आहे; पण मला येथे डिरकाव व्हावयाला मला प्रत्येक विषयांत परिक्षा द्यावी लागली, व हायस्कूलमध्ें फिजिक्स वगैरे विषय शिकल्याचे सर्टिफिकिट द्यावें लागलें. कोर्स (पोकळ) विश्वविद्यालयांमधून डिरकाव होईल; पण तेथें ज्ञानाच्या नांवानें शून्य असतें. अर्थात डाक्टरीकरितां मुंबईमॅट्रिकपर्यंत शिकलेल्या मुलास इकडे हायस्कूलपासून अभ्यास सुरु करावा लागेल व नंतर ४ वर्षें विश्वविद्यालयांत काढावीं लागतील. सायन्स हा ज्ञान व्यापक आहे. सायन्स शिकणें म्हणजे केमिस्ट्री, फिजिक्स

डोकें असल्यास विश्वविद्यालयांमधून या गोष्टी होऊ शकतात. पण एकच विषय ध्यावा लागतो व त्यातच तन-मन-धन खर्चावें लागतें. पदवी पाहिजे असल्यास अभ्यास अमुक इतका झाला पाहिजे अशा अटी असतात. पदवी नको असल्यास -फक्त ज्ञान पाहिजे असल्यास- विषयाचें ज्ञान असलें म्हणजे झालें; पुढील अभ्यास सहज पार पडतो. त्यास स्पेशल कोर्स असें म्हणतात. आजपर्यंत बरेच निधार्मी इंजिनीअरिंगच्या योग्यतेचे अमेरिकेस गेले व त्यांना यश आलें असें म्हणतात, त्यांत किंतपत सत्यता आहे, याची मला शंका आहे. कारण, सध्यां अमेरिकेत हजारो मराठे बीस आहेत. यापैकीं बहुतेकांनीं आदी प्रथमपासून सुरुवात केली आहे. कित्येकांनीं हायस्कूलमध्यें दोन वर्षें घातली आहेत, व कित्येक स्पेशल कोर्स घेऊन आपल्या अंगच्या कर्तबगारीनें निधार्मी विद्यालयाच्या चालकांना खूष करून, त्यांच्याकडून मेहेरबानीस्तातर पदव्या घेऊन गेले आहेत. सर्वांटोपिक ज्ञान पाहिजे असेल तर तें प्रथमपासून घेणेंच चांगलें. आरिस् कॉलेजमध्यें प्रवेश करावयाचा असेल तर आपल्या इकडील अभ्यास थोडा सुधारणेनें पडतो. बी. ए. ला एम्. ए. होता येतें अथवा पी एच्. डी. सारखे पदव्या दोन वर्षांतर मिळवूं शकतात, तरी थोडा त्रास सोसावा लागतोच.

प्रश्न २:- खर्चाच्या व रहाण्याच्या दृष्टीनें पाश्चिमात्यांना सोईस्कर होईल किंवा कसें?

उत्तर:- अमेरिकेच्या पाश्चिमात्यांनाकडे 'कॅलीफोर्निया' हा मोठा प्रांत आहे. यांचा हवा हिंदुस्थानांतील हवेप्रमाणें असल्याकारणानें त्यास 'इंडिया' असेंही कोणी कोणी म्हणतात. अर्थात हिंदुस्थानी लोकांस मानवत रें उत्तम आहे. भाजीपाला व फळफळावळ तिकडे स्वस्त मिळत असल्यानें, कारण, तिकडून सर्व अमेरिकेस त्याचा पुरवठा होतो. हिंदू लोकांस तिकडे काम मिळतें व ते लोक त्यांना तेथेंच गाजून घेतात. तेथें हिंदू कामकऱ्यांची संख्याही जास्त असल्यामुळें काम मिळण्यास अडचण पडत नाहीं. भाजीपाला फी भाव जास्त असतो, परंतु अलीकडे या बाजूस हिंदू लोकांवर कडक नजर फेकण्यांत येत आहे. वर्णभेद अत्यंत भासूं लागला आहे. याच प्रांतांतील लोकांनीं कॉंग्रेस-पुढें एक बिल आणलें असून त्याचा उद्देश हिंदू लोकांस हांकलून लावण्याचा आहे. निधार्म्यांनाही यापासून थोडा त्रास पोंचतो.

प्रश्न ३:- उत्तम शिक्षण व स्वावलंबन यांची जोड कोणत्या ठिकाणीं होईल?

उत्तर:- हा प्रश्न सोडवणें कठीण; परंतु याचें उत्तर जितकें कठीण आहे तितकेंच तें सोपेंही आहे; कारण, अमेरिकेत निधार्मी अर्थी अर्थीक आपला सर्व आपणच चालवितात. एक रुपयांत निधार्म्यांमध्यें आमच्यासारखा एक निधार्मी सहज खपला जातो. चांगलें विद्यालय असो वा वाईट असो, असो निधार्मी सर्व ठिकाणीं आहेतच आणखी कोणताही ठिकाणीं काम मिळूं शकेल.

अमूकच शिक्षण चांगलें म्हणून सांगतां येणार नाहीं हें ज्या त्या विद्यार्थ्यांवर अवलंबून राहील.

प्रश्न ४ :- इथें तेथें असलेल्या हिंदी विद्यार्थ्यांची स्थिति कशी आहे? आतां नवीन विद्यार्थ्यांना तिकडे येणें दुष्कर होऊं लागलें आहे काय?

उत्तर :- हिंदुस्थानचे एकूण विद्यार्थी १५० असावेत. यांपैकी हाँस्टेल तरी 'सेल्फ सपोर्ट' करून घेणारे असतील. महाराष्ट्रीय २० आहेत, हें वर सांगितलेंच आहे. यांतील १६ स्वतःचा खर्च स्वतःच चालवितात; पण अलिकडे पुरविनिर्दिष्ट बिल पुढे आल्यापासून थोडी वानवा सुरुवात झाली आहे व त्यापासून विद्यार्थ्यांना बराच त्रास पोंचण्याचा संभव दिसत आहे. पूर्वीकडे म्हणजे न्यूयार्कच्या बाजूला व दक्षिणेस 'मोन्टिसेलो'च्या बाजूला वर्णभेदाचे जास्त बंड आहे व तेथें हिंदू लोकांना तुच्छ जरी नाहीं तरी कमी प्रतीचें लेखतात. याचे कारण अमेरिकेच्या या भागात बहुतेक श्रीमंत लोक (Aristocrats) आहेत हे लोक हिंदू लोकांनाच कमी लेखतात असें नाहीं, तर पाश्चिमेकडून येणाऱ्या कोणाही मनुष्याला ते तसेच लेखतात तिकडे खर्च फार येतो, फी फार पडते. पाश्चिमबद्दल वर लिहिलेंच आहे. येऊन जाऊन राहिला मध्यदेश. हा विभाग स्वस्तही कमी येतो, कामही मिळतात, लोकही चांगले आहेत व हिंदूंचा मान थोडाफार राखलेला जातो मी ज्याठिकाणीं (अनार्बर-मिचिगान युनिव्हर्सिटी) राहतो त्या ठिकाणी अशी स्थिति आहे खरी.

प्रश्न ५ :- स्वावलंबनाची साधने कोणतीं? अमेरिकेत गेल्यावर हिंदुस्थानांत कोणत्या गोष्टी दिवुन गेलें असतां उपयोग होईल?

उत्तर :- काम कोणतेही मिळते. आऊट्या कालापासून सुरुवात [redacted] कराची लागते एखाद्या कचेरींत नोकरी काम मिळण्याचा संभव कमी. राईटिंग, शॉर्टहँड वगैरे शिकून ठेवल्यास कदाचित उपयोग होईल, बहुधा होत नाहीच. इकडे विशेष काम म्हणजे वाढण्याचें (Table-waiting) अथवा स्वयंपाकाचें अगर कोणती शेकण्याचें (Furnace-keeping) मिळतें. वाढण्याचे काम करावे व त्याठिकाणीं दररोज तीन वेळ पुरून जेवावे कोणती शेकावी व खोलीपुरतें भाडें मिळवावें. सुट्टीच्या दिवसांत होतील तर काम मिळण्याचा बराच संभव असतो. जेमेतेम चालून महिना ३०/४० डालर्स (१००/१२५ रुपये) देतात. नाहीं तर घुजबें अगर दुसऱ्या इतर जिन्नसांची निर्मिती करून पहा मिळेलही. याशिवाय दुसरीं कामें मिळतच नाहीं असें नाहीं. दुकानांत राहणें, एखाद्या घरीं राहून घरची सर्व व्यवस्था पहाणें, डाक्तरांकडून ऑफिसची कामें वगैरे कामें आहेत. येथें स्वावलंबन करण्यास तेथें काय शिकावें याचा उत्तर एवढेच की, मनाची तयारी पाहिजे. जेवढे तें काम करण्यास आपण लायक आहों व आपण जितपत तें काम

पाडू असा इंद्रनीलचंद्र असल्यावर काय कमी? अंगी कारकुणा न स्पष्ट पण मधुर वाणीनें दुसऱ्यांत संमोहन करण्याची तयारी, लोकांवर छाप बसवून आपले काम करून घेण्याची कला हा गुणसमुदाय अंगी बाणल्यावर कोठेंही दुर्गीव पडणार नाहीं

प्रश्न ६:- एक महिन्याचा व वर्षाचा खर्च काय येईल?

उत्तर:- एका विद्यार्थिला एका महिन्याला कमीतकमी ३० रु. खोलीभाडें पडतें. तें आठवड्यास द्यावें लागतें. एखाद्या खाणावळींत जेवणयास गेल्यास ४५ रु. पडतात मांसाहारास दरमहा ४५ रु. पडतात. वरचा खर्च भुणावळ, तेल, फणी, ब्रूपॉलिडा, टूथपावडर, सोप इ. - दरमहा १८ रुपये येतो, म्हणजे कपडालत्ता व पुस्तकें, यांखेरीज ८५ रु. दरमहा (अमेरिकन लोकांप्रमाणें राहण्यास) खर्च येतो. स्वतः स्वयंपाक करून शाकाहार करावयाचा असल्यास महिना २०-२५ रु. पुरतात. आज पांच महिने मी यच्चयावत् पद्धतीनें राहात आहें व माझा खर्च २३ रु. पर्यंत गेला नाहीं. इतर खर्च कमी केला तर खोलीभाडें वगैरे मिळून ५० रु. बस होतात प्रकृतीही चांगली राहते. स्वतःचा पद्धतीसि चिकटून राहण्याची इच्छा मात्र पाहिजे. कपडे वगैरे फार महाग मिळतात फी विद्यालयाद्वारें अगदी स्वस्त आहे.

प्रश्न ७:- हिंदुस्थानांतून निघतांना पासपोर्ट व पैशासंबंधी काय काय तजवीज केली पाहिजे?

उत्तर:- आपल्या जिल्ह्याचे कलेक्टर यांस भेटून आपला हिंदुत्वाचा पवित्र हेतु निर्दित करून 'आयडेंटिटी सर्टिफिकेट' त्यांजकडून मिळवावें पासपोर्ट मुंबईसच घ्यावयाचा असतो. पैसे घेणें ते बरोबरच असलेले बरे. सहज दोन हजार रुपये घरून निघण्यासारखे असतील तर ते सर्वच एकदम जवा करून आपले म्हणजे सोसिं पडते; कारण येथें आल्यावर ओळखी होणें, रीतभात समजणें, अभ्यासाचें वसतीत बसणें या गोष्टीस कांहीं महिनें लागतात, व त्या अवधींत हे पैसे चांगले उपयोगी पडतात. 'आयडेंटिटी सर्टिफिकेट' जवळ असणारा 'ब्रिटिश' प्रजा आहे व तो आपली जी हकीकत सांगत आहे ती खरी आहे इतकेंच सिद्ध होते. 'पास-पोर्ट' मुंबईस एजंट-जनरल खात्याचे अधिकाऱ्यांकडून घ्यावयाचा असतो. त्यांत अमुक इसम हा कायमचा - 'लेबरर किंवा कुली' नसून निर्धनी आहे अशी खात्री पटविलेली असते. यामुळें त्या लोकांकडून होणारा जुलूम आपणास सहन करावा लागत नाहीं.

[१८ आगस्ट १९२९

पनामा-कालव्या-प्रदर्शन

—x—

महाराष्ट्रीयांस विनंती

(लेखक - डॉ नारायण सुब्राव हर्डीकर, अमेरिका)

१९१५ साली अमेरिकेत पनामा-कालव्यानिमित्त जगत् प्रदर्शन भरणार असून त्या प्रदर्शनास हजर राहण्यासाठीं अमेरिकेने जगास निमंत्रण केल्याची हकीकत श्रीयुत गोकरनूर यांनीं 'चित्रमय जगत्' मध्ये प्रसिद्ध केलेल्या लेखांवरून महाराष्ट्रीयांस माहीत झालेली आहेच त्यानंतर येथील हिंदु मंडळीनीं स्थापन केलेल्या 'कामैशनच्या' पत्राच्या गोषवारा विशेष पत्रांतून एकाना प्रसिद्ध झाला असेल प्रस्तुत लेख अमेरिकेतील महाराष्ट्रीय मंडळांत प्रसिद्ध करण्यात येत असून या कार्याची मराठी वाचकवृंदाला अशी विनंति आहे कीं या अमेरिकेच्या विश्व-प्रदर्शनांत सामील होण्यासाठीं हिंदुस्थानांतून कांही मंडळींना तरी इकडे पाठविण्याची व्यवस्था करावी, व त्याबरोबर कांहीं कलाकौशल्याच्या वस्तु पाठवून आपल्या पौर्वात्य राष्ट्राचा मान राखला नुसत्या वस्तु पाठवून न थांबतां इकडील अन्न वस्त्र कर्मे करण्याच्या मजूरांना, नाना तऱ्हेच्या सर्कसवाल्यांना, थ्रिकस इत्यादि खेळांत नैपुण्य मिळविलेल्या खेलाडूना, तसेच श्रीयुत पंडित विष्णु दिगंबर पलुस्करासारख्या गायनाचार्यांना आणी उत्तम अभिनय करणाऱ्या नटांना या प्रदर्शनास हजर राहण्यास प्रोत्साहन द्यावे. गायनविद्याविशारद श्रीयुत पलुस्कर जर आपला मेळा घेऊन या प्रदर्शनास येतील तर भारतभूमीचे नांव सर्वत्र गाजतील, गर्दि, भारत, महाराष्ट्र इत्यादि नटक मंडळ्यांतील चांगले नट प्रदर्शनास हजर राहतील तर जगाच्या पाठीवर असलेल्या सर्व देशांतील प्रमुख नराचे त्यांस या हिवाळी खेळ पहाण्याला सांपडतील व त्यापासून त्यांस बरेच शिकता येतील. गोड लोक म्हणतात त्याप्रमाणें आमची निव्वळ भातसाठ मरी असलेली तरी मनांत आणूं तर दहा पंधरा गोऱ्यांनाहि हार जाणार नाहीं; हें प्रो राममूर्ती, दोराबजी इत्यादि मल्लांच्या कसरतींनें जगाच्या निदर्शनास आणता येईल. प्रत्येकानें एक एक देशाला जाऊन आपली कर्तबगारी दाखवावयाची मनांत आणल्यास पैशाची पैशाचा चुराडा होऊन बेबंद नुकसान होतें. त्यांतून प्रत्येकाजवळ मुबलक पैसा असतोच असें नाहीं. पैसा नसून इच्छा असणाऱ्यांना आपले गुण दाखविण्याला व प्रदर्शनाच्या फारच थोडाला उपयोग करून घेता येईल; कारण तेथें सर्व जगांतले चांगले गुणग्राहक लोक लोटलेले असतात, प्रदर्शन भरविण्याचा उद्देशाहि पण असाच असतो. म्हणून ही संधि वांया न दवडतां हिंदबांधवांनीं प्रदर्शनाला जातीनें हजर राहण्याबद्दल येथील महाराष्ट्र मं.कडे विनंति आहे.

~~पौर्वात्यांच्या कलाकुसरीचें काम पहाण्यास अमेरिकन लोक उत्सुक दिसत~~
~~आहेत. हें लक्षांत घेतां प्रदर्शनांतून न सांपडणाऱ्या स्वदेशीय सहज करून घेतां~~

१८९३ साली शिकागो येथें "कोलंबिया प्रदर्शन" भरलें असतांना अमेरिकेनें हिंदुस्थानला पाचारण केलें, पण व्यापारी नांवें एका पार्शी गृहस्थाशिवाय त्यानेंही कोणी आला नाहीं. या पार्शी व्यापाऱ्यानें स्वतःच्या फायद्यासाठीं थोड्या जिन्नसा आणल्या होत्या. तसेंच त्यानें एक हिंदू देवालय उभें करून, मूर्तीची पूजा करण्याकरतां एका ब्राह्मणाला आणलें होतें. त्यादेवतार्चा रचना, ती मूर्तीची स्थापना, या ब्राह्मणाचा वेष वगैरे पाहून अमेरिकनांना मोठें कौतुक वाटलें. त्याशिवाय कांहीं चहाचे मळेवालेही आपल्या चहाचा प्रसार करण्यासाठीं आले होते. या प्रदर्शनाच्या रिपोर्टावरून तेवढ्याकरतांच अमेरिकन लोक खूष झाले असें आढळून येतें. त्यानंतर १० वर्षांनीं म्हणजे १९०३ साली सेंट लुई नामक एका ठिकाणीं दुसरें एक प्रदर्शन भरलें. यावेळीही अमेरिकेनें हिंदुस्थानास निमंत्रण दिलें, पण त्याचा स्वीकार करण्यात आला नाहीं; परंतु अमेरिकनांनीं या खेपेस निराळ्या रीतीनें खटपट केली. १९०२ साली हिंदुस्थानचे व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झन हे होते त्यांचा व अमेरिकेचा विकट संबंध (त्यांच्या पत्नी, लेडी कर्झन, या शिकागो येथील एका धनाढ्य गृहस्थाची कन्या होत) असल्यामुळें अमेरिकनांचें म्हणणें त्यांस अंशतः तरी कबूल करावें लागलें व त्यांनी खासगीरीतीचा एक कमिशनरची योजना केली. या कमिशनरानें जमशेदपूरमाणेच्या एक संगमरवरी दगडाचें देवालय बांधलें व पूजेसाठीं एका मद्रासी ब्राह्मणाला (वर्ण तद्देशांत आणावा) आणलें. यावेळीं अमेरिकनांना कांहीं हे आवडलें नाहीं. १९०३ सालच्या प्रदर्शनानंतर १९१३ साली प्रदर्शन भरावयाचें; कारण प्रत्येक दहा वर्षांतीं एक मोठें प्रदर्शन भरविण्याचा त्यांचा विचार आहे. पण पनामा-कालव्याच्या निमित्तानें आजपर्यंत दोनहि व कोठेंहि झालें नाहीं अशा तऱ्हेचें एक जगी प्रदर्शन भरविण्याचा [redacted] उद्देशानें १९१३ ऐवजीं १९१५ हें साल मुकर्र करण्यांत आलें व दोन-चार वर्षांच्या अवधींत तयारी करून सर्व जगाला निमंत्रण देण्याचा निश्चय १९१० सालींच झाला. याप्रमाणें निमंत्रणासाठीं पाठविण्याकरितां एका कमिशनची योजनाही झाली. या कमिशनने सातां समुद्रांपलीकडे जाऊन यच्चयावत राष्ट्रांना जाईल आमंत्रणपत्रिका दिली तसेंच आपल्याही देशाला देण्याच्या उद्देशानें कमिशननें आपला मोर्चा तिकडे फिरविला, पण त्यांस काय अपशकून झाला कोण जाणें, त्यास हिरमुसलें परत यावें लागलें असें प्रदर्शनाधिकाऱ्यांकडूनच आम्हांला जातमी लागली. "आमचें कमिशन समुद्रांतूनच परतलें तरी तुमच्यावर त्यांचा रोष नाहीं. तुम्हीं खाटेकाणीं हजर रहावें अशी आमची मनापासून इच्छा आहे; तरी अवश्य यावें" अशी प्रदर्शनाधिकाऱ्यांनीं इच्छा प्रकट केली असून हिंदुस्थानाकरतां त्यांनीं एक जाहीरही देण्याचें ठरविलें आहे. एवढेंच नव्हे तर पैलतीरावरील आपली भाकें व्यक्त करण्याकरतां प्रदर्शनाच्या महाद्वाराच्या शिखरावर गजारूढ हिंदू सम्राटाच्या पुतळ्या शेजारी देश असून, त्याच्या डाव्या बाजूस भगवान बुद्ध, कैनथिन्युअस व झोरोॲस्टर यांच्या मूर्ती आहेत व उजव्या अंगास [redacted] भगवान ख्रिस्तजन्मी मूर्ती बसविली आहे. या सर्व तर्‍हेवरून आमचीं प्रदर्शनांत हजर रहाणें, अमेरिकनांच्या आवडता दृष्टीस पडणें.

हैदुस्थानातील काही मंडळींच्या व मेथील हिंदू नियोजकांच्या आणी प्रदर्शन कमिटीतील अधिकाऱ्यांच्या सहाय्याने "हिंदुस्थानचे पनास वर्षाचा प्रदर्शन - कमिशन" नावाची एक संस्था स्थापन झाली आहे. या संस्थेचा मुख्य उद्देश हिंदुस्थानातील दुसऱ्याही लोकांना प्रदर्शनिच्या कामी हरप्रकारे साहाय्य करून इकडे शिल्पसाहित्य पाठविण्यासाठी लोकांची यात्रे येथे प्रदर्शनिच्या जागेवर दुभाषांची योजना करून अलोट्या शिल्पसाहित्याची नोंद हिंदुस्थानातून प्रदर्शनिसाठी येणाऱ्या लोकांना समाधानकारक्याचा मार्ग न पडेल अशी व्यवस्था करावयाची, असा आहे. हा उद्देश नजरेसमोर ठेवूनच हिंदुस्थानकर अवलंबून आहे. कारण या देशाच्या गोष्टी आहेत व त्या संस्थेच्या शास्त्रीकारेच्या आहेत. हिंदुस्थानातून येणारा शिष्टमंडळ तरच या संस्थेचे कार्य सुरळीत चालेल. संस्थेचा अध्यक्ष डॉक्टर कॉमुन कॅलास देवशास्त्री हे असून उपाध्यक्ष डॉक्टर विनायक यशवंत देवधर, राहणार इंदूर, हे आहेत. डॉक्टर कॉमुन शास्त्री हे संयुक्त प्रांताचे (आग्रेचे) रहिवासी असून अलिअलाहाबाद आहेत. चालीं २ - ३ वर्षे मेडिकल ऑफिसर म्हणून शास्त्रीबुवांकडे उत्तरही हिंदुस्थानातील लोकांचे चांगले चलन आहे. त्यांच्या शास्त्रीबुवा मान देऊन उत्तरही हिंदुस्थानातील लोकांनी प्रदर्शनिसाठी आपापल्याकडून हजार सहाय्याचे वचन दिले आहे. तसेच बंगाल व दक्षिणेकडे काही मंडळी जेथल्या इतर अनेक संस्थेतून प्रदर्शनिसाठी वस्तूही येणार आहेत. फार आश्चर्य महाराष्ट्रात काहीच चलवल दिसून येत नसल्यामुळे आम्हास ओढा खेद वाटतो परंतु महाराष्ट्रातल्या दिनवीकडे पहाता काही तेच आपल्याला अपेक्षेही वाटू लागते. तथापि या होईना, आमच्या प्रदर्शनिच्या चुटीचे फायदाकडे लक्ष देणारी थोडी मुलाखत महाराष्ट्रातून आत आलेल्या वरून आम्हे आहे. आणखी याच आठवड्यात आम्ही मराठी वाचकांना नजरेस पडेल अशी विनंती करणारी आ.

आतां येथील वाचकांनाही एक दोन सूचनाही करावयाच्या आहेत. कारण आम्ही महाराष्ट्रीय हिंदुस्थानांतील इतर प्रांतीयांप्रमाणे श्रीमंत नसून गरीब आहोत. आम्हाला दुष्काळाने पछाडले असल्यामुळे चार पैसे खर्च करण्यासाठी खिशात नाहीत; आम्हाला रोगराईने जर्जर केल्यामुळे चार पावले चालण्याची शक्ती उरली नाही; स्वदेशाच्या अपयशीच्या भोंवऱ्यात सांपडल्यामुळे आमचे सर्वस्व हिरावले गेले आहे म्हणून आम्हाला सर्वतोपरी नेटाने यांत सांपडलेले ते स्वातंत्र्य एकाएकी ठिकाणी दहाव्याची पाळी आली आहे. अर्थात अमेरिकेसारख्या भागात असुकारपत्तीकडे असलेला देशांत भरणाऱ्या प्रदर्शनिस जाऊन

परंतु पैशाचें सामर्थ्य आमचा महाराष्ट्रीयांत कोण अंकगार? एका मनुष्याला कांहीं नाहीं सुटलें तरी ३ हजार रुपये सहीसलामत पाहिजेत. हेंच लीन हजार देशगतलया देशांत रुपये कोट्यवधि व्यापा अनोमान फायदा होईल. या गोष्टी प्रतिकया रुपया आहेत रतीनकयाच पाहिजे असे रुपया आहेत की. प्रदर्शनास हजार रहाण्यापासून वरील सर्व लीशण मिळतें व अनंत फायदे होतात; म्हणून आमचा असें वाटते की, महाराष्ट्रानें फ्रेंचीन काच अथवा आरीअडचणी आजूबा डेऊन मराठ्यांचें नांव राखण्याकरतां निदान सहावी प्रतिनिधी पाठविलेच व त्याजकरतां कर ज्या ज्या वस्तु जमतीस त्या त्या पाठवून द्याव्यात. महाराष्ट्राच्या सांपत्तिक स्थितीकडे लक्ष देऊन व प्रदर्शनाला महाराष्ट्रानें हजर राहण्याची अवश्यकता लक्षांत आणून आम्हांस ज्या सूचना कराव्याशा वाटतात त्या खालीं नमूद केल्या आहेत. त्याचा सर्वांनी विचार करावा व शक्य तितक्या लवकर आमचा अभिप्राय कळवावें अशी विनंती आहे

१ महाराष्ट्राचे उत्तर, (नागपूर कडील भाग) २ मध्य (मुंबई पुणे वगैरे) ३ दक्षिण (बेळगांव धारवाड वगैरे) असे तीन भाग समजावे

२ प्रत्येक भागाकरतां एकेक कमिटी स्थापन करून खालीलही कमिट्यानवर एक सुरव्य कमिटीन नेमावें

३ प्रत्येक कमिटीने आपआपल्या भागातील वस्तु एकत्र करण्याचा प्रयत्न करावा असें करण्यास जड जाणार नाहीं कारण आतांकडे हिंदुस्थानी प्रदर्शने भरत असून त्यांतील उत्कृष्ट वस्तु सहज एकत्र करतां येतील दक्षिण महाराष्ट्रात गेल्या नोव्हेंबरमध्ये धारवाडास प्रदर्शन भरले होते त्यांत कोणत्या वस्तु पाठविल्या होत्या हे त्यांचे प्रदर्शन-कमिटीचे कॉलजेचे अमोल. ज्ञानप्रकाश वगैरे असे कळतें की, मुंबईसारखे एक प्रदर्शन भरले आहे. तर अशा प्रदर्शनांतून चांगल्या वस्तु निवडण्याला त्या त्या भागाच्या कमिटीला जड जाणार नाहीं. प्रयत्न केल्यास त्या वस्तूंही मिळू शकतील. (धारवाडच्या प्रदर्शनात द्रोणच पुष्कळशी मांडलेला होता असें कळते; तर कमिटीने पुष्कळशी निवडून आणली पाहिजे नव्हेत अशी रवाजगी दिसते आहे!) अशा सर्व निवडक वस्तु सुरव्य कमिटीकडे पाठविण्यात व त्यांच्या पसंतीने त्यांची रवानगी येथील हिंदु-कमिटीकडे करावी.

४ प्रत्येक कमिटीने आपआपल्या भागकरतां दोन प्रतिनिधी मिळवीत व त्यांच्या सर्व सर्वासहीत येण्याजाण्याचा खर्च गोळा करावा. दोन प्रतिनिधी पाठविण्याची ऐपत नसल्यास निदान एकाला तरी अवश्य नियोजावें व दुसऱ्याला त्या भागांतून

अमेरिकेस गेलेल्या एका विद्यार्थ्याला आपला प्रतिनिधी म्हणून प्रदर्शनाला पाठविण्याच्या सुद्धांत जानेयास लिहिलें, व त्याचा अल्प खर्च त्या मार्गानें सोसावा. यायोगें पैसेहि कमी लागतील व कामाहि सोपेल. सर्व प्रतिनिधींनीं मुख्य कमिशनच्या अनुमतीनें आपला कार्यक्रम आंखला पाहिजे. फंडाची व्यवस्थाहि मुख्य कमिशनच्या ताब्यांत असावी. या प्रतिनिधींचीं नांवें व वस्तूंची यादी अमेरिकेंतील कमिशनकडे पाठवावी.

५ वा मुख्य कमिशनरचें दुसरें कार्य आहीं प्रीपेड विनांने केल्याप्रमाणें लोकांना प्रोत्साहन द्यावयाचें व ऐपत असलेल्या मंडळांस इकडे पाठवावयाचें हें असेल.

६ प्रदर्शनामधें निरनिराळीं कन्व्हेन्शन्स भरणार आहेत. अशा वेळीं ज्यांस कन्व्हेन्शनमधें बोलावयाचें असेल अशा मंडळींला इत्थंभूत तें प्रोत्साहन व माहिती पुरविण्याचें कामहि मुख्य कमिशनरनें व मार्गदर्शक कमिटीनें करावें.

अशून जी जी माहिती पाहिजे असेल ती ती कमिशनरचे ऑफिस श्रीयुत कृष्णदेव शास्त्री १८४४ जॅक्सन बुलेवार्ड शिकागो (Dr. K. D. Shastri 1844 Jackson Boulevard Chicago, Ill. U.S.A.) या पत्त्यावर पत्र धाडल्यास मिळू शकेल. अमेरिकेतील कोणाही महाराष्ट्रीयांस लिहिल्यास मिळेल. आम्हांस नें नें पाठवावयाचें तें तें आहीं वेळेवर पाठवूं, पण जास्त खुलासा पाहिजे असेल त्यांनीं खुशाल लिहावा.

वरील सूचनांचा विचार करून महाराष्ट्रीयांनीं लौकर कामास लागावें असा माझी आग्रहाची विनंती आहे कारण प्रदर्शन ता २० फेब्रुवारी सन १९१५ रोजीं उघडणार असल्यामुळें आतां गमावयाला बिलकुल अवधी नाहीं. हें पत्र ऑगस्ट महिन्यांत प्रसिद्ध होईल. त्यानंतर प्रदर्शनाला फक्त ६ महिने राहतात, तेवढ्या अवधींत येथें इमारती बांधून झाल्या पाहिजेत व इतर व्यवस्थाहि झाल्या पाहिजेत; करतां अरि करावी. ज्यांस तारेनें अल्पशी संमति कळवावयाची असेल त्यांनीं (Hindusthan, Chicago) या पत्त्यावर तार करावी. प्रदर्शन २२८ दिवस म्हणजे ता ४ डिसेंबर १९१५ पर्यंत उघडें राहील. प्रदर्शनासाठीं रेलवे कंपन्यांनीं आपलें भाडें $\frac{1}{3}$ पेक्षांहि कमी केलें आहे. अधिक फार लिहिण्यासारखें नाहीं असें वाटतें. तरी सर्वांनीं याला अग्रक्रम फारसा द्यावा, अशी पुनश्च विनंती करून येथेंच थांबतों.

अमेरिकेतील वैद्यक-संस्था.

[23 मार्च १९१५.

(ले:- डॉ. ना. सु. हर्डीकर).

न्यूयॉर्कपासून सानफ्रान्सिस्कोपर्यंत पसरलेल्या ४८ संयुक्त अमेरिकन संस्थानात एकंदर ११९ वैद्यक-संस्था आहेत. पैकी ११ होमिओपाथी, ३ इलेक्ट्रोपाथी, व बाकीच्या १०५ ऑलोपाथी हीं शास्त्रें शिकविणारीं आहेत. जाहीं वर्षांपूर्वी शिकागो येथें स्थापन झालेल्या अमेरिकन मेडिकल असोसिएशनने अमेरिकेतील सर्व संस्थांत शिकून या संस्थांची वर्गवारी केली. संस्थेंतील शिक्षकांची योग्यता, शिकण देण्याची तऱ्हा, संस्थेला जोडलेली रुग्णालयें, संस्थेंतील साहित्यसामुग्री इत्यादिकांवर या वर्गवारीची इमारत उभारली असल्यामुळे या असोसिएशनने केलेलें काम सर्वांना पसंत पडलें आहे. असोसिएशनमध्यें सरकारी अधिकारी व खाजगी धंदेवाले हे समप्रमाणांत असल्यामुळें त्याच्या अंगात सर्व संस्थांवर सारखा चालत आहे. आणि त्यामुळें असोसिएशनने केलेले नियम सर्वांना निमूटपणें पाळले जातात. या ११९ वैद्यक संस्थांचे चार भाग पाडले असून त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यास अ अधिक (A plus), अ, ब, आणि क अशी नांवे देली आहेत. अ अधिक संस्थांची संख्या २४ असून या सर्वोत्तम्य (Acceptable) ठरलेल्या आहेत म्हणजे या २४ वैद्यक-संस्थात कोणताहि दुर्गुण नाहीं व त्या वैद्यकीयें शिक्षण देण्यास लायक आहेत. अ जाति ४२ संस्था येत असून त्यांत थोड्या दुर्गुणी आहेत, तरी शिक्षण देण्यास त्या पात्र होऊ शकतात. राहिलेल्या ५३ संस्था ब व क या सदरांत घातल्या असून यांनीं पायाशुद्ध इमारत बांधावी, असा या असोसिएशनचा त्यांस सूचना आहे. अ अधिक २४ संस्थांपैकी काहीं लेख १०-१२ च संस्था उत्कृष्ट म्हणून निवडून काढतात, आणि त्यांसच त्या सर्व नावाजलेल्या आहेत. या निवडक अ अधिक हारवर्ड व जॉनहापकिन्स यूनिवर्सिटी, स्यानफोर्ड व कॉलिफोर्निया यूनिवर्सिटी आणि शिकागो व मिचिगान मध्य अमेरिकेत आहेत.

या संस्थांत प्रवेश झाल्यिझाल्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने पुनः दोन भाग पाडाले लागतात. कारण हारवर्ड जॉन हापकिन्ससारख्या संस्थांपैकी बी.ए, बी.एस. सी सारख्या पदवीपर्यंत शिकलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाहीं इतकेंच नव्हे तर फिजिक्स, केमिस्ट्री, बायॉलॉजी व नॉरमी या विषयांचे पूर्ण ज्ञान त्यांस असावे लागतें. राहिलेल्या इतर संस्थांत कोणत्याहि पदवीची अट जरी नाहीं, तरी एसबद्दल कॉलेजमध्यें फिजिक्स वगैरे विषयांचें दोन वर्षेपर्यंत अध्ययन केल्याबद्दल सर्टिफिकेट दाखवावें लागतें. या सर्टिफिकेटाशिवाय वैद्यक संस्थेंत बिलकुल प्रवेश होत नाहीं; कारण या विषयांशिवाय पुढील विषयांचें ज्ञान होणें कठीण आहे, आणी त्यांचे दृढ सबनूत आहे. संस्थेंत प्रवेश झाल्यापासून एम. डी. पदवी मिळेपर्यंत ४ वर्षांचा अवधि लागतो; पण यापुढें हा अवधि ५ वर्षें व्हावयास असून त्यानंतर १ वर्ष रुग्णालयांत काढणें लागणार आहे. अर्थात डॉक्टर व्हावयास असलेल्या संस्थेंत प्रवेश होऊन व वैद्यक संस्थेंत चार अर्धे सहा वर्षें

लागत; पण पुढे ४ वर्षे लागतील, असें येथें जाहिर झालें आहे. फिजिक्स इत्यादि विषयांचें अध्ययन कॉलेज एवढ्या संस्थेंत एक दोन वर्षे नेथकींचें डिग्रीचें संपादन केलेल्या विद्यार्थ्यास या अधिक संस्थेंत प्रवेश करतां येतो; पण ज्या विषयांचें अध्ययन झालें असेल त्या विषयांत पहिला धक्का लागतो. पास झाल्यास त्यांस वरच्या वर्गांत बसतां येतें; नाहींतर प्रथमपासून सुरुवात करावी लागते. परदेशांहून येणाऱ्या विद्यार्थ्यांसहि हाच नियम लागू आहे.

नेथ, संस्थेंतले अभ्यासक्रम मोठ्या खुबीनें ठरविलेला असतो. पुस्तकी ज्ञानापेक्षां प्रत्यक्ष कामा (Practical work) कडे विशेष नजर पोंचविली जाते. पहिल्या वर्षाचा अभ्यास Anatomy, Physiology, Histology, Bacteriology इत्यादि विषयांचा असतो. यांत डिसेंबरांतून सकाळीं ९ तास व दोनप्रहरीं ५ तास सतत उभें राहून, 'प्रत्यक्ष काम' करावें लागतें. तेंच तें काम तीनचारदां निरनिराळ्या रीतींनीं करून घेण्यांत येतें. रोज काम विद्यार्थ्यानें आपली अडचण हुशारी खर्च करून केलें पाहिजे, नेमलेल्या दरम्यानिला पाहिजे, तरच समजावून सांगण्यांत येतें; नाहीं तर नाहीं. परीक्षेंत त्याच्या रोजच्या कामाची गणना करण्यांत येते. १०० त ७० गुण ज्यास मिळतात, तोच पास असें समजतात. दुसऱ्या वर्षी Pathology, Pharmacology, Hygiene, Surgical Anatomy इत्यादि विषय शिकवितात, आणि नंतर Medicine, Surgery, Midwifery यांचे विषय निसत्या व चवथ्या वर्षांकरितां राखून ठेवीतात. कालेजच्या फिजिक्स यांचे विषयावर पहिल्या दोन वर्षांचि विषय अवलंबून असतात, व Bacteriology, Pathology यांचें ज्ञानहि माहितीं असल्याशिवाय कोणासहि डॉक्टर होतां यावयाचें नाहीं, अशी दृढ सबबूत असल्यामुळें हे विषय फारच कसोशीनें शिकविले जातात, आणि प्रत्यक्ष कामाचा अत्यंत भर देण्यांत येतो. दुसऱ्या वर्षापासून शेवटपर्यंत दोनप्रहरीं १ पासून ५ पर्यंत प्रत्यक्ष काम करावें लागतें व सकाळीं ९ पासून नाहींपर्यंत व्याख्यानें ऐकावीं लागतात, असें पडत आहे.

अमेरिकेच्या मानानें शिक्षण फार स्वस्त मिळतें. कांहीं कांहीं संस्थांमधून वर्षाची एकूण फी फक्त ५० डॉलर्स (१५६ रुपये) आहे; कांहीं खाजगी संस्थांमधून ही फी २०० डॉलर्स (६२५ रु.) असते. पण गरीब अमेरिकनांना त्याचा विशेष त्रास होत नाहीं; कारण ज्यांच्याकडून फी कमी आहे, त्या ठिकाणीं ते जातात व आपला अभ्यास संपवितात. परंतु परदेशांहून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें ही फी अधिक आहे. प्रत्यक्ष काम करीत असतांना आपल्यास ज्या ज्या गोष्टींची जरुर असते त्या त्या आपल्या आपणच आणाव्या लागतात; जसें भाड्यानें घ्याव्या लागतात. उदाहरणार्थ, प्रत्येकाजवळ एक सूक्ष्म जंतुदर्शक यंत्र (Microscope) असलेंच पाहिजे. तांबूत नसल्यास तें भाड्यानें घेतलें पाहिजे. या कारणामुळें रक्कम जास्त येतें. पण डिग्रीच्या मानानें तो खर्च काहींच नाहीं, असें म्हणावें लागतें.

या अवधि २८ संस्थेंत जरी वर्षाचि रक्कम डिग्रीक मागतें आहेत असें नाहीं

पण त्यांच्यातील काही दोषांक फारच चांगले असून अन्य गुणामुळे त्या संस्थाची योग्यता मोठी झालेली असते. सर्जरी, मेडिसिन् हे विषय असे जॉन हापकिन्स व हार्वर्डमध्ये चांगले शिकविले जातात, तसे दुसऱ्या ठिकाणी क्वचित्च आढळून येते. ऑब्स्टेट्रिऑलोजी, हायजीन, सिफिलीस रोग हे असे मिचिगान व शिकागोमध्ये शिकविले जातात तसे अन्य ठिकाणी फारच थोडया संस्था शिकवितात. न्यूयॉर्कमधील पेशंट हॉस्पिटल स्कूलमध्ये डोळे, कान, नाक इत्यादिक रोग हे विशिष्ट विषय उत्कृष्ट रीतीने शिकवितात. सर्व विषयांवर एकाच ठिकाणी चांगले शिक्षक मिळत नाहीत. याचे एक कारण असे की, अमुक एका ठिकाणी चांगला मनुष्य आहे, असे ऐकिले की, हे अमेरिकन लोक, कोठेही पगाराची लालूच दाखवून त्या मनुष्यास आपल्या संस्थेत घेऊन जातात असे झाले म्हणजे दुसरा चांगला मनुष्य मिळेपर्यंत या संस्थेच्या तो विषय लुला पडतो. उदाहरणार्थ, मिचिगानमध्ये अनाटॉमी चांगली शिकविली जात असे, पण जॉन हापकिन्सने एकदम फार वाढवून त्या मनुष्याला आपल्याकडे नेले असता मिचिगानच्या काही काळपर्यंत तरी तो विषय लंगडा पडला. या व अशा अनेक कारणामुळे अमेरिकन मुले एकाच संस्थेत शेवटपर्यंत फार क्वचित शिकतात. ज्याठिकाणी जो विषय चांगला शिकविला जातो त्या ठिकाणी ते जातात, पारिसला वसतात व आपला पुढील अभ्यास संपवितात.

येथवर आपण स्वतः संस्थांबद्दल व अभ्यासाबद्दल विचार केला. आता याचा आम्हा हिंदुस्थानवासीयांना कितपत फायदा आहे, याचे परीक्षण करू. आम्ही हिंदुस्थानी लोक, काळे व अमेरिकन लोक गोरे. या काळ्यागोऱ्या वर्णाचा भेद या ठिकाणी उपस्थित होतो. ज्या आठ १०-१२ निवडक वैद्यक संस्थांत पूर्वेस न्यूयॉर्क व दक्षिणेस असलेल्या संस्था काळ्या लोकांच्या विरुद्ध आहेत, व काळ्या लोकांच्या दर्शनाने यांचे नाक मुरडले जाते. मध्यअमेरिकेत व पश्चिमेस ज्या संस्था आहेत त्या बऱ्या आहेत, व हिंदुस्थानी विद्यार्थ्यांबद्दल त्यांना आदर आहे. पण हा अभिमानही अलीकडे थोडथोडा नाहीसा पावू लागला आहे. यांची कारणे अन्य कितीही असली तरी आमचे विद्यार्थीच काही अंशाने कारणीभूत आहेत, असे मोठ्या दुःखाने म्हणावे लागते. निर्लज्ज व क्षेतकरी मुलांनी वैद्यक संस्थेबद्दल यांच्या चालकांकडे विचारपूस करणे, हे तर क्षम्यच. पण ही विचारपूस करण्याची कित्येकदा तऱ्हा फार तिरस्करणीय असते आणि याचे कारणकरता वैद्यक संस्थेच्या चालकांची मने थोडी कलुषित होतात. "वैद्यक संस्थेच्या चालकास लिहिण्यात येणारी पत्रे मोठी विचित्र लिहिलेली असतात. पत्राचा कागदसुद्धा चांगला नापरलेला नसून पत्र लिहिल्यानंतर तपासलेलेसुद्धा नसते. नाईट अक्षरांत पुष्कळसा चुकून झाला थेऽगुत्तरी इंग्रजी लिहिलेली पत्रे येत असल्यामुळे "अहा मुलांना आमच्या संस्थेतील अभ्यास कसा सार पाडता येईल? पत्रे लिहायलासुद्धा ज्याला येत नाही तो वैद्यकीसारख्या कठीण अभ्यासाचा कसा होणार नाही." असे उद्गार क

चालकांच्या तोंडून बाहेर आले तर त्यांत आश्चर्य नाही. कित्येक मुले आपल्या दोन तीन पिढ्यांचा इतिहास लिहून आपण मराठे आहों, आपणास पृथ्वीराज स्कालरशीप मिळावी, किंवा फुकट शिक्षण मिळावे, असे लिहितात, तर कित्येक निराळ्या रीतीने आपली दैन्यावस्था दाखवितात! हेतू स्तुत्य असो, पण तो तडीस नेण्याचा मार्ग मात्र आदरणीय नसतो, हे पत्रलेखकांनी ध्यानांत ठेवावयास पाहिजे. एकाच्या वेडयावाकड्या आचरणाने सर्व देशास तुच्छ मानवून ध्यावे लागते. म्हणून प्रथम विचार करणे चांगले. अशा तऱ्हेची पत्रे मात्र दोन ठिकाणी दाखविण्यात आली; म्हणून त्याचा या ठिकाणी नामनिर्देश करणे जरूर पडले. दुसरे, हिंदुस्थानातील वैद्यक संस्थांत मिळणारे ज्ञान आमच्यापेक्षा कमी आहे, अशी इकडील लोकांची समजूत आहे आणि खरोखरी ते तसेच आहे अमेरिकेतील अभ्यासक्रमांत व हिंदुस्थानांतील अभ्यासक्रमांत फार अंतर आहे. प्रथम हिंदुस्थानचा शिक्षाविषयाची पद्धतच पहा! फिजिक्स सारखे विषयाकरिता पहिले वर्ष, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी अनॉटोमी, फिजिआलॉजी, मटेरिया मेडिका हे विषय; व चवथ्या पांचव्या वर्षी राहिलेले सर्व विषय. ज्या विषयांवर वैद्यकीय इमारत अवलंबून असते ते विषय हिंदुस्थानात चवथ्या व पांचव्या वर्षी शेवटी शेवटी फार तोडूनच शिकविले जातात. पण तेच विषय अमेरिकेत पहिल्या, दुसऱ्या वर्षी संपवावे लागतात Bacteriology, Pathology हे विषय चांगले न शिकल्याशिवाय मेडिसीन चांगले समजत नाही तर तो दोष पोरांचा की पोरांचा, याशी मला काही कर्तव्य नाही पण हे मात्र खरे की, हिंदुस्थानातील वैद्यक संस्थांत ५ वर्षे शिकून तयार झालेल्या डॉक्टरास अमेरिकेतील वैद्यक संस्थांपैकी दुसऱ्या वर्षाच्या पोरांइतकेही ज्ञान नसते. कारण, या वर्षांचे त्यांचे सर्व विषय आलासारखे असतात. हिंदुस्थानातील डॉक्टरास पोराची रवानगी भरण्याकरिता कडीकाढी प्रॉक्टिस करावी लागते; बाकी विषयाचे नावाने बहुधा शून्यच असते विषय समजलेले डॉक्टर लोक फारच थोडे आढळतात अशा स्थितीत एखादा डॉक्टर असो किंवा निरक्षर असो, यास अमेरिकन वैद्यक संस्थांनी कुचकामी म्हटले, तर यांत वावगे ते काय? तरीही परीक्षेस बसून पास झाल्यास, त्याला योग्यते प्रमाणे त्यास क्लास दाखविणेस जाते. तसेच फिजिक्स इत्यादिकरिता दोन वर्षे घालविल्याचे सर्टिफिकेट दाखवावे लागते. ज्यास वैद्यकीय अभ्यास करावयाकरिता अमेरिकेस यावयाचे असेल त्यांनी खुशाल यावे; पण आपल्या हिंदुस्थानी ज्ञानावर अवलंबून न राहता, भिडे सोडू प्रथमपासून अभ्यास करावयास प्रारंभ करावा. ज्यांचा मनांत तसे करावयाचे नसल्यास संस्थेत तसे करण्यास भाग पाडतात, हा भाग वेगळा. अथवा एखाद्या विशिष्ट विषयांत प्राविण्य मिळविण्याकरिता यावे. हिंदुस्थानांत मिळालेले आपले वैद्यक शिक्षण आपणास पुरे आहे, फक्त, आपणास पदवी पाहिजे, असे म्हणणाऱ्यास ७ अथवा ८ व ७२ संस्थांतून परत तर दिली जातात नाहीच पण निरुपयोगाने माघार घेण्याचा प्रसंग मात्र येईल. हिंदुस्थानांतून

येणाऱ्या विद्यार्थ्याला जर्मन, फ्रेंच किंवा लॅटिन यापैकीं एका भाषेचें ज्ञान पाहिजें; त्याशिवाय पदवी दिली जात नाहीं. अमेरिकेत काहीं काहीं ठिकाणीं पदव्या विकल्या जातात; पण त्यांत काहीं अर्थ नाहीं. शिक्षण सोडेकरणीं बिलकुल मिळत नाहीं, असें म्हटलें तरी चालेल; आणि अशा पदव्यांसाठीं हिंदुस्थानांतून इतक्या लांब येणें शोभेसारखें नव्हे. अमेरिकेत येऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनीं प्रथमपासून शिक्षणाच्या तयारीनें यावें किंवा पदवीची आशा सोडून आपल्या देशाच्या उपयोगीं पडेल अशा एखाद्या विषयांत नाविष्य मिळविण्या करतां यावें. यापैकीं दुसऱ्या मार्गी केलेलें बरें ठरणार. कारण, असें विशिष्ट विषय शोधक स्वभावीं शिकतां येऊन त्याकडेच आपलें तनमन अर्पण करतां येतें व त्याविषयांत लवकरच पारंगतता मिळवून नवे शोध करण्याला फुरसत मिळते. असे विशिष्ट विषय शिकण्याच्या ठिकाणीं त्रासुरक्षणानें शिकावेंसें जातात, हें वर सांगितलेंच आहे. तर ज्या त्या संस्थांशीं पत्रव्यवहार करून आपणास पाहिजे ती माहिती मिळवावी आणि आपल्या कार्यास लागावें. अशी माहिती विद्यापीठालयांनां विचारण्याचा प्रसंग येऊं नये, म्हणून अशा अधिक वैधक संस्थांची फी, राहणी, विषय वगैरेची माहितीची एक यादी तयार केली आहे. पण ती केसरींत छापणें अशक्य असल्यामुळें त्यांच्या ऑफिसांत राहिली. माहिती पाहिजे असणाऱ्यांनीं ती पहावी व त्याहिपेक्षां जास्त काहीं हवें असल्यास आम्हास लिहावें; आम्ही त्याचें उत्तर देऊं. पत्ता खालीलप्रमाणें आहे.

डॉ. नारायण सुबराव हर्डीकर.
युनिव्हर्सिटी ऑफ मिचिगान,
आन् आर्बर; मिच्
युनायटेड स्टेट,
अमेरिका.

देशास आरोग्याची जरुरी

(ले.डॉ.ना.सु.हार्डीकर, अमेरिका)

"Public health is the foundation on which reposes the happiness, the propperity and the power of the country, and the care of the public health is the duty of the Statesman."
- Disraeli

धर्मार्थकाममोक्षाणामारोग्यं मूलमुत्तमम ।

चिरकालपर्यंत टिकण्याच्या हेतूनें अेखादी इमारत उठावयाची असेल तर प्रथम पाया जसा शुध्द व घट्टमुट्ट बांधावा लागतो तसेंच अेखाद्या देशाची उन्नति करावयाची असेल तर प्रथम तेथील लोकांची शरीरप्रकृति सुदृढ करुन त्यांस धष्टपुष्ट करावें लागते. कारण त्या लोकांवरच सर्व गोष्टी अवलंबून असतात. देशांत व्यापारधंदा वाढवून धनधान्याची समृध्दि करणें शांततेनें, सुखासमाधानांत राहून अेडापडा टाळणें आण सर्वत्र शिक्षणाचा प्रसार करुन नवीन नवीन शोध लावणें या गोष्टी लोकांच्या प्रकृतीवरच अवलंबून असतात. म्हणून प्रत्येक मनुष्याचें पाहिलें कर्तव्य स्वत:ची व सर्व जनसमूहाची शरीरयाष्ट सुदृढ राखावयाचा प्रयत्न करणें हें होय. जनतेचें आरोग्य या विषयाकडे याचसाठीं सर्वांनी लक्ष दिलें पाहिजे.

आपल्या देशांत आजपर्यन्त जी प्राणहानि झाली व सध्यां होत आहे ती तीन कारणांमुळें. (१) देशांत वाढत असलेलें दारिद्र्य हें महत्वाचें कारण. (२) सांसर्गिक व साधे रोग. (३) आरोग्याविषयीं जनतेचा अज्ञानीपणा. या तीनाहि गोष्टींकडे आज आम्ही महाराष्ट्रीय बंधुभगिनींचें लक्ष वेधतों आहोंत.

मनुष्य दारिद्री असेल तर त्याची प्रकृति आज नाहीं उद्यां क्षीणहि होणारच. कारण दारिद्र्यामुळें त्यांस आपल्या शरीरास ज्या प्रमाणांत अन्नाची जरुरी असते त्या प्रमाणांत तें देतां येत नाहीं. व जें थोडें अन्न तो मिळवील त्याच्यासाठीं त्यांस अहोरात्र खपावें लागत असल्यामुळें कमी पोषण मिळणाऱ्या शरीरास जितकी विश्रांति द्यावा लागते तितकी त्यांस मिळत नाहीं. यामुळेंच कामकरी वर्गांत मद्यप्राशनाची चाल पडली आहे. गरीब स्थितींत दिवस कंठणाऱ्या लोकांचा वर्ग सोडून आपण मध्यमस्थितींतील लोकांकडे पाहिलें तरीहि आम्ही म्हणतो त्याची प्रचिति येअील. अेखाद्या शाळामास्तराचेंच उदाहरण घेऊं. त्यास माहन्याकाठीं पगार झालें तर १५ रु. मिळतात. त्यांत त्याने आपल्या घरचा संसार चालवून मुन्हां समाजांत शिष्ठतेनें राहण्याचा प्रयत्न करावयाचा, म्हटलें म्हणजे

म्हणजे म्हणजे पगाराच्या दुप्पट खर्च येतो. तशांत पोराबाळांच्या शिक्षणाची तरतूद, त्यांच्या लग्नकार्याची तयारी, अशा दिसंबंधानें त्यांस व्यवस्था करावी लागते. याचा परिणाम हात आंखडून पैसा खर्च करण्यांत होतो. त्यामुळें पोटांस मिळत असलेल्या अन्नांतहि त्यांस फरक करावा लागतो. असें झालें म्हणजे कुटुंबांतील मनुष्याची प्रकृति क्षीण व्हावयाला किती मुशीर. आणि अेकदां ती बिघडली कीं रोगांना आपली जाळी पसरावयास बिलकुल अवधी लागत नाहीं. अन्नामुळें मनुष्यांस स्वाभाविकरित्याच अेक अंगभूत शक्ति (Vitality) मुत्पन्न होते. अन्नाचा पुरवडा जसाजसा कमी होत जाअील तसतशी ही शक्ति कमी होते. या शक्तीचें काम असें आहे कीं, बाहेरून येणाऱ्या कोणत्या शत्रूस ती घुळीस मिळवितें. प्लेग, कालऱ्याचें जंतू शरीरांत घुसलें म्हणजे त्या ठिकाणीं ही शक्ति(Vitality) - - - असेल तर त्या जंतूंना प्रथम तिच्याशी दोन हात करावें लागतात. व ही शक्ति केव्हांहि दांडगी असल्यामुळेंच जंतूंचा पराभव होतो. अेवढेंच नाहीं तर त्यांस त्या ठिकाणींच यमसदनास जावें लागतें. अशी शक्ति जर शरीरांत नसेल तर जंतूंना आपलें साम्राज्य स्थापन करण्यास बिलकूल वेळ लागत नाहीं. आणि शेवटीं त्यामुळें मनुष्याची प्राणहानि मात्र होते. ज्याठिकाणीं दुष्काळ पडलेला असतो, त्याठिकाणीं कॉलरा हटकून ठेवलेला. याचें कारण दुष्काळग्रस्त लोकांत अन्नाभावामुळें अंतर्भूत शाक्त नाहींशी झालेली असतें. घाणेरडे व दूषित पाणी प्यालें कीं, तें लोक ताबडतोब मरतात. तसेंच दारिद्र्यामुळें होतकरू विद्यार्थ्यांच्या मनावर व शरीरावर केवढी वाअीट परिणाम होतो हें वाचकांस माहीत असेलच। गरीबीमुळें अशा मुलांना शिक्षण मिळत नाहीं व तें मिळविण्याच्या भरांत ती आपल्या प्रकृतीची हानि करून घेतात. मधुकरी मागून किंवा वारानें जेवणारी मुलें काहलीं म्हणजे अभ्यासाची, जेवणाची व राहण्याची अशा काळजीऱ्यांनें वाकलेली दिसतात. थोडयाच पैशांत अेखाद्या गालेच्छ खोलींत राहून, घाणेरडया व अमंगळ खाणावळींत जेवणारे विद्यार्थी पुण्यासारख्या शिक्षणागारांत किती तरी सांपडतील. अशा अेखाद्या गावांतील विद्यार्थ्यांच्या प्रकृतीचें मान काढण्याचा जर अेखाद्या महात्म्यानें प्रयत्न केला तर त्यांस काय बरें दिसून येअील! अवनत व सर्व बाजूंनीं होत असलेला -हास यापुढें दुसरें काय दिसणार ! म्हणून शरीरप्रकृति सुधारावयाला प्रथम दारिद्र्यनाश झाला पाहिजे. तसें न होअील तर आपलें अनेक लोक दुष्काळांना व रोगांना बळी पडतील. व आपला देश अधोगतीला जाअील. याकरतां निरर्थक होणाऱ्या प्राणहानीचें जें मुख्य कारण त्याकडे दृष्टि देऊन आपल्या देशांत धनधान्य समृध्दि कशी होअील, आपल्या जिवीतास अवश्य असलेले सुखोपभोग आपणांस कसे लाभतील व प्लेग रोगादिकांना कसें पिटाळतां येअील याची विचारपूस करून सर्व बंधुभगिनींनी आतां कामास लागलेंच पाहिजे.

दारिद्र्यामुळें आजपर्यन्त जी प्राणहानि झाली तिकडे पाहिलें म्हणजे काळीज चर्र होते. दुष्काळाच्या कारणांची मिमांसा आम्हांस करावयाची नाहा. पण येवढी गोष्ट सुघड आहे कीं, त्यामुळेंच आतापर्यन्त लक्षावधी लोक दगावले. ~~१८७७~~ १८७७ सालच्या दुष्काळांत ५० लक्ष लोक मरतात न मरतात तोंच दुसऱ्या वर्षी म्हणजे १८७८ सालीं जवळजवळ १० लक्ष लोक कामास आले. पुढें १८९० पासून तो १९०० पर्यन्तच्या येका दशकांत [19 million deathes can be attributed with some reason actual starvation or to the disease arising therefrom Lancet, May 1901, London].
केवळ १० वर्षांत येक कोटी ९० लक्ष लोक दुष्कासमारीनें यमसदनास गेले, असें ल्यान्सेटचा बातमीदार म्हणतो. १९०१ पासून तों आतापर्यन्त मुकेनें गेलेली लोक मेले याची नक्की जरी संख्या आली नाही तरी ती अल्पस्वल्प नसावी असें म्हणावयास बिलकूल हरकत नाहीं. अशा दुष्काळामुळें लोक मरतात असें म्हणावें तर १८९७ सालच्या येका दुष्काळांत सर्व हिंदुस्थानांत जवळजवळ ८० लक्ष गुरें मेल्याचे दुष्काळी रिपोर्टावरून दिसून येतें. जगाच्या पाठीवर असें अनेक देश आहत कीं, तेथें अवर्षण व अगर अतिवृष्टि होऊन दुष्काळ पडतो. पण जनसंख्येच्या मृत्यू संख्या मानानें आमच्या देशाइतकी कधीहि नसते. आम्ही व आमचा देश कोणत्यावेळीं या दुष्काळाच्या कचाट्यांत सांपडलो आहे तें कळत नाहीं. पण त्यामुळें होणाऱ्या मृत्यूसंख्येस आम्ही आतांच आळा न घालील तर पुढें आम्हास कोणत्याप्रकारची स्थिति येईल याची कल्पना करणें शक्तीबाहेरचें आहे. देशांत वाढत असलेल्या दारिद्र्यामुळें होणाऱ्या प्राणहानीचा विचार कांहीं वेळ सोडून देऊन सांसर्गिक व इतर रोगानें होणाऱ्या मृत्यूसंख्येकडे पाहिलें म्हणजे तेथील सर्व अंधकारच दिसून येतो.

१९११ सालीं हिंदुस्थानांत ७६ लक्ष ४० हजार लोक मरण पावले, असें प्रसिद्ध झालें आहे. [Statesman's Year Book 1914].
त्यांत ७ लक्ष ३४ हजार प्लेगनें, व ३ लक्ष ५४ हजार कॉलऱ्यानें मेले, असें समजतें. म्हणजे ११ लक्ष लोक दोन सांसर्गिक रोगास बळी पडले. ज्या रोगाचे सुधारलेल्या युरोप-अमेरिकेंत नांवहि नाही व जेथून हरप्रयत्ने करून त्यांस घालवून देण्यांत आले आहे त्या रोगांनीं केवळ १२ महिन्यांच्या अवधींत ११ लक्ष लोक यमसदनास पाठवावें यावरून आपल्या प्रगतीची बरोबर कल्पना करवते. ज्या रोगाची कारणें पूर्णरीतीनें समजली असून जें प्रतिकार करण्याजोगे आहेत व ज्यास इतर देशांतून हाकून लावण्यांत आलें आहे, त्या रोगांनी सुधारणेच्या शिखरावर पोचलेल्या विसाव्या ~~शतकांमध्ये~~ शतकांतील दुसऱ्या दशकांतसुद्धां आपला मायदेश जर्जर व्हावा व (प्रो. राजवाडे यांच्या शब्दांत) सुंदर, पित्यांकडून आपणासारख्या ऋणीपुत्रांना मृत्यू यावा यापरती नीच स्थिति दुसरी कोणती असणार. वाचकहो, आपल्या देशांत १८९६ सालाच्या ऑगस्ट महिन्यांत प्लेगनें पाय ठेवला तेव्हांपासून तों आतापर्यन्त

१९ वर्षांच्या अवधींत सुमारें १ कोटी लोक मुंदीर, पिसव्यांमुळें मृत्यूपंथास गेलें. म्हणजे प्रत्येक वर्षास सर्व हिंदुस्थानांत ह्मणजे प्लेगला ५ लक्ष लोक बळी पडत असें अनुमान काढावयास कोणतीहि हरकत नाही. युरोपांत चाललेला रणसंग्राम काहीं ना काहीं उद्देशाकरतां चाललेला आहे. त्याठिकाणीं जाणूनबुजून नरयज्ञाचें सत्र सुरूं करण्यांत आलें आहे. अशाप्रसंगीं स्वदेशाभिमानार्थ व साम्राज्य संरक्षणासाठीं जर अेक सोडून चार कोटी लोक धारातीर्थीं पडलें तर आम्हांस किंवा कोणासहि त्यापासून वाअीट वाटणार नाहीं. किंवा असाध्य रोगापासून वा वयोवृद्ध होऊन जर लोक मरण पावतील तरीहि वाअीट वाटण्याचें काहींच कारण नाहीं, पण जें धष्टपुष्ट आहेत व ज्यांच्यापासून आपल्या देशाला अनंत फायदे व्हावयाचें आहेत असें लोक निवारण करतां येणाऱ्या रोगांच्या साथीवर साथी येऊन झाडाला गळणाऱ्या बोरांप्रमाणें जर पटापट मरूं लागले तर कोणाचें हृदय करपणार नाहीं; स्वत:च्याच मूर्खपणानें हीं प्राणहानि आपण करून घेत आहोंत. तरी त्याचें निवारण करण्यासाठीं आपण कंबरा कसून कामास लागलें पाहिजे. जनतेच्या आरोग्याकडे दृष्टी दिल्याशिवाय प्लेगानें होणारी मृत्यूसंख्या टळणार नाहीं.

म्हैसूर व त्रावणकोर या दोन संस्थानांची संख्या १९११ च्या खानेसुमारी-प्रमाणें ९३ लक्ष, समजा १ कोटी आहे. दोनाहि संस्थानचें मिळून वार्षिक उत्पन्न ३।। कोटी रुपयांचे आहे. या दोन संस्थानांत वर्षाला जे जितके उत्पन्न होते ते त्या ९३ लक्ष किंवा १ कोटी प्रजेमुळें होते. जितके लोक त्या ठिकाणीं नसते तर ३।। कोटींचें उत्पन्न तेथील राज्यकर्त्यांस मिळते ना. आणि जर जनसंख्या वाढली असती तर आहे त्यापेक्षांहि जास्त उत्पन्न झालें असते. अेखादा राजा वस्ती नसलेल्या प्रदेशांत जाऊन पैसा गोळा करण्याकरतां प्रयत्न करूं लागला तर त्यास त्याठिकाणीं काय मिळणार. फार झालें तर ४ झाडांची वाळलेली पानें व ७-८ खुंट. पण तेंच त्याठिकाणीं लोकांची वस्ती करविली तर अेकाप्रकारें धनप्राप्ति होऊं लागते. १९ वर्षांत प्लेगनें १ कोटी लोक मेले असें वर आलेंच आहे. या लोकांचा प्लेगपासून जर बचाव झाला असता तर म्हैसूर व त्रावणकोर या संस्थानाअेवढें अेक छोटेखानी संस्थान थाटून त्याजपासून वर्षास ३।। कोटींचें उत्पन्न येथील संस्थानिकांस लाभलें असतें, व त्याचा देशकार्यीं विनियोग करतां आला असता. तसेंच सर टी माधवराव दिवाण विश्वेश्वरय्या यासारखी नररत्नेंहि लाभली असतीं, पण, पण काय ! आमचाच अज्ञानीपणा आम्हांस सर्वतोपरी तोंडघशी पाडीत आहे. अशारीतीनें आमचें नुकसान तर होतेंच, पण याहिपेक्षां आम्हांवर व आमच्या देशावर जी जबाबदारी येऊन पडते ती मोठी आहे. आधींच दुष्काळ आणि तेरावा महिना म्हणतात त्याप्रमाणें बेजबाबदारीनें गांजला असतांना प्लेग-कॉलऱ्यानें अनाथ झालेल्या बायकापोरांस खावयाला कोण देणार, व त्यांच्या लालनपालनाची कोण पसतपास करणार. दुष्काळास व प्लेगेत्यादि

रोगांस त्यांनीं बळी पडावें हा एकच मार्ग त्यांस माकळा असता. व त्याप्रमाणें घडतेंहि. आजपर्यन्तची बालविधवांची संख्या पाहिली म्हणजे हें सर्व आहे तरी काय असें वाटून जीव नकोसा होतो. अनेक विधवा झाल्या व त्यांचेकडून अनेक अनेक कुकर्मे घडूं लागली म्हणून समाजसेवकांनीं बालविवाहावर त्याचे खापर फोडून लग्नाची वयोमर्यादा वाढविण्याची खटपट केली, पण या समाजसेवकांस आम्ही असा सवाल करतो कीं, बाबांनो, देशांत बालविवाह झालें, तर प्रजा अशक्त होत जाईल, पण बालविधवा कां वाढाव्यात, लहान वयांत मुलींचा विवाह झाला म्हणून तरुण नवऱ्यांनीं कां मरावें, हाच प्रश्न आधी सोडवा. तरुणतरुण पोरें जर मृत्युमुखीं पडली नसती, तर बालविधवाहि दृष्टीस पडल्या नसत्या. त्यांचेकडून कुकर्मेहि घडलें नसतें व त्यांचा पुनर्विवाह करण्याची नसती जबाबदारीहि तुम्हांस येऊन पडली नसती. तर या सर्वां च्या मुळाशीं काय आहे तें शोधून काढा. आमच्यामधें या सर्वांचें कारण आपल्या देशांतील आरोग्य शास्त्राचें अज्ञान हें होय. म्हणून सर्वांनीं तिकडे लक्ष द्यावें.

याप्रमाणेंच कॉलरादि इतर सांसर्गिक रोगांची स्थिति घ्यावयाची झालीच तर जर कोणता दुष्ट रोग असेल तर तो कॉलरा होय. या रोगानें गेल्या २० वर्षांच्या अवधींच सहजासहजीं ७५ लक्ष किंवा जास्त बळी घेतले असतील. केवळ स्वच्छ पाणी मिळविण्याचा आपण कानाडोळा करतों म्हणूनच इतके लोक निरर्थक मरतात. विषमज्वर, न्युमोनिया, डिपथिरीया, क्षयरोग, डिसेंटरी, इत्यादि रोगांनीं होणाऱ्या मृत्यूसंख्येची कल्पना करवत नाही. युरोपांत प्लेग व कॉलऱ्याचें नावहि नसल्यामुळें विषमज्वराच्या उच्चाटनाकडे सर्व थोरामोठ्यांचें डोळे लागले आहेत. त्याप्रमाणें प्लेग, कॉलरा, यांचें उच्चाटन करण्याकडे आपल्या लोकांची दृष्टी वळली पाहिजे.

०००००००

केसरी-मराठा-ग्रंथशाला
५६८ नारायण, पुणे २.

केसरी मंगळवार दि. १८ सप्टेंबर १९१६

देशास आरोग्याची जरुरी

(ले. डॉ. ना. सु. हर्डीकर, अमेरिका)

"Public health is the foundation on whic reposes the happiness, the propperity a the power of the country, and the care the public health is the duty of the Statesman."
- Disraeli

धर्मार्थिनाममोक्षाणामारोग्यं मूलमुत्तमम ।

चिरकाल टिकण्याच्या हेतूने जेवादी इमारत बांधावयाची असेल तर प्रथम पाया जसा शुद्ध व घट्टमुट्ट बांधावा लागतो तसेच जेवाढा देशाची उन्नति करावयाची असेल तर प्रथम तेथील लोकांची शरीरप्रकृति सुदृढ करून त्यांस धष्टपुष्ट करावें लागते. कारण त्या लोकांवरच सर्व गोष्टी अवलंबून असतात. देशांत व्यापारवृद्धी वाढवून धनधान्याची समृद्धि करणें शांततेनें, सुखासमाधानांत राहून शिडापिडा टाळणें आणि सर्वत्र शिक्षणाचा प्रसार करून नवीन नवीन शोध लावणें या गोष्टी लोकांच्या प्रकृतीवरच अवलंबून असतात. म्हणून प्रत्येक मनुष्याचें पहिलें कर्तव्य स्वतःची व सर्व जनसमुहाची शरीरयष्टि सुदृढ राखावयाचा प्रयत्न करणें हें होय. जनतेचें आरोग्य या विषयाकडे याचसाठीं सर्वांनी लक्ष दिलें पाहिजे.

आपल्या देशांत आजपर्यन्त जी प्राणहानि झाली व सध्यां होत आहे ती तीन कारणांमुळें. (१) देशांत वाढत असलेले दारिद्र्य हें महत्त्वाचें कारण. (२) सांसर्गिक व साथे रोग. (३) आरोग्या विषयीं जनतेचा अज्ञानीपणा. या तीनहि गोष्टीकडे आज आम्ही महाराष्ट्रीय बंधुभगिनींचें लक्ष वेधणार आहोंत.

मनुष्य दरिद्री असेल तर तर त्याची प्रकृति आज नाहीं तुद्यां क्षीणहि हीं होणारच. कारण दारिद्र्यामुळें त्यांस आपल्या शरीरास ज्या प्रमाणांत अन्नाची जरुरी असते त्या प्रमाणांत तें देतां येत नाहीं. व जें थोडे अन्न तो मिळवील त्याच्यासाठीं त्यांस अहोरात्र खपावें लागत असल्यामुळें कमी पोषण मिळणाऱ्या शरीरास जितकी विश्रांति द्यावी लागते तितकी त्यांस मिळत नाहीं. यामुळेंच कामकरी वर्गांत मद्यप्राशनाची चाल पडली आहे. गरीब स्थितींत दिवस कंठणारा लोकांचा वर्ग सोडून आपण मध्यमस्थितींतील लोकांकडे पाहिलें तरीहि आम्ही म्हणतो त्याची प्रचिति येईल. जेवाढा शाळामास्तराचेंच उदाहरण घेऊं. त्यांस महिन्याकाठीं पगार झालें तर ५५ रु. मिळतात. त्यांत त्याने आपल्या घरचा संसार चालवून पुन्हां समाजांत शिष्ठतेनें राहण्याचा प्रयत्न करावयाचा, म्हटलें म्हणजे

म्हणे म्हणे पगाराच्या दुप्पट खर्च येतो. तशांत पोराबाळांच्या शिक्षणाची तरतूद, त्यांच्या लग्नकार्यांची तयारी, बिऱ्हाडसंबंधानें त्यांस व्यवस्था करावी लागते. याचा परिणाम हात आखडून पैसा खर्च करण्यांत होतो. त्यामुळें पोटांस मिळत असलेल्या अन्नांतहि त्यांस फरक करावा लागतो. असें झालें म्हणजे कुटुंबांतील मनुष्याची प्रकृति क्षीण व्हावयाला किती वेळ? आणि केव्हां ती बिघडली की रोगांना आपली जाळी पसरावयास बिलकुल अवधी लागत नाहीं. सदर अन्नामुळें मनुष्यांस स्वाभाविकरित्याच जे अंगभूत शक्ति (Vitality) उत्पन्न होते. अन्नाचा पुरवठा जसाजसा कमी होत जाईल तसतशी ही शक्ति कमी होते. या शक्तीचें काम असें आहे की, बाहेरून येणाऱ्या कोणत्या शत्रूस ती घुबीस मिळविते. प्लेग, कॉलऱ्याचें जंतू शरीरांत घुसले म्हणजे त्या ठिकाणीं ही शक्ति(Vitality) - - - असेल तर त्या जंतूंना प्रथम तिच्याशी दोन हात करावें लागतात. व ही शक्ति केव्हांहि दांडगी असल्यामुळेंच जंतूंचा पराभव होतो. येवढेंच नाहीं तर त्यांस त्या ठिकाणींच यमसदनास जावें लागतें. अशी शक्ति जर शरीरांत नसेल तर जंतूंना आपलें साम्राज्य स्थापन करण्यास बिलकूल वेळ लागत नाहीं. आणि झेवटीं त्यामुळें मनुष्याची प्राणहानि मात्र होते. ज्याठिकाणीं दुष्काळ पडलेला असतो, त्याठिकाणीं कॉलरा हटकून ठेवलेला. याचें कारण दुष्काळग्रस्त लोकांत अन्नाभावामुळें अंतर्भूत शक्ति नाहींशी झालेली असते. घाणेरडे व दूषित पाणी प्यालें की, तें लोक ताबडतोब मरतात. असेंच दारिद्र्यामुळें होत्कर्ष विद्यार्थ्यांच्या मनावर व शरीरावर किती वाईट परिणाम होतो हें वाचकांस माहीत असेलच. गरीबीमुळें अशा मुलांना शिक्षण मिळत नाही व तें मिळविण्याच्या भरांत ती आपल्या प्रकृतीची हानि करून घेतात. भाकरी मागून किंवा वारानें जेवणारी मुलें काढिली म्हणजे अभ्यासाची, जेवणाची व राहण्याची अशा काळजीमधीनें वाकलेली दिसतात. थोड्याच पैशांत अेखाद्या गलिच्छ खोलींत राहून, घाणेरड्या व अमंगळ खाणावळींत जेवणारे विद्यार्थी पुण्यासारख्या शिक्षणागारांत किती तरी सांपडतील. अशा अेखाद्या गावांतील विद्यार्थ्यांच्या प्रकृतीचें मान काढण्याचा जर अेखाद्या महात्म्यानें प्रयत्न केला तर त्यांस काय बरें दिसून येईल! अवनति व सर्व बाजूंनीं होत असलेला -हास यापरतें दुसरें काय दिसणार ! म्हणून शरीरप्रकृति सुधारावयाला प्रथम दारिद्र्यनाश झाला पाहिजे. तसें न होईल तर आपलें अनेक लोक दुष्काळांना व रोगांना बळी पडतील, व आपला देश अधोगतीला जाईल. याकरतां निरर्थक होणाऱ्या प्राणहानीचें जें मुख्य कारण त्याकडे दृष्टि देऊन आपल्या देशांत धनधान्य समृद्धि कशी होईल, आपल्या जिवितास अवश्य असलेले सुखोपभोग आपणांस कसे लाभतील व क्षय रोगादिकांना कसें पिटाळतां येईल याची विचारपूस करून सर्व बंधुभगिनींनी आतां कामास लागलेंच पाहिजे.

दारिद्र्यामुळें आजपर्यन्त नी प्राणहानि झाली तिकडे पाहिलें म्हणजे काढीज चर होते. दुष्काळाच्या कारणांची मिमांसा आम्हांस करावयाची नाही. पण येवढी गोष्ट सुघड आहे कीं, त्यामुळेंच आतापर्यन्त लाखवधी लोक दगावले. ~~१८७७~~ १८७७ सालच्या दुष्काळांत ५० लक्ष लोक मरतात न मरतात तोंच दुसऱ्या वर्षी म्हणजे १८७८ सालीं जवळजवळ १० लक्ष लोक कामास आले. पुढें १८९० पासून तो १९०० पर्यन्तच्या येका दशकांत [19 million deaths can be attributed with some reason to actual starvation or to the disease arising therefore Lancet Mew 1901, London] केवळ १० वर्षांत येक कोटी ९० लक्ष लोक दुपासमारीनें यमसदनास गेले, असें ल्यान्सेटचा बातमीदार म्हणतो. १९०१ पासून तों आतापर्यन्त मुकेनें किती लोक मेले याची नक्की जरी संख्या आली नाही तरी ती अल्पस्वल्प नसावी असें म्हणावयास किल्लूल हरकत नाही. अशा दुष्काळामुळें लोक मरतात असें म्हणावें तर १८९७ सालच्या येका दुष्काळांत सर्व हिंदुस्थानांत जवळजवळ ८० लक्ष गुरें मेल्याचे दुष्काळी रिपोर्टावरून दिसून येतें. जगाच्या पाठीवर असें अनेक देश आहेत कीं, तेथें अवर्षण व अगर अतिवृष्टि होऊन दुष्काळ पडतो. पण जनसंख्येच्या मृत्यू संख्या मानानें आमच्या देशाशितकी कधींहि नसते. आम्ही व आमचा देश कोणत्यावेळीं या दुष्काळाच्या कचाट्यांत सांपडलो आहे तें कळत नाही. पण त्यामुळें होणाऱ्या मृत्यूसंख्येस आम्ही आतांच आळा न घालील तर पुढें आम्हांस कोणत्याप्रकारची स्थिति येईल याची कल्पना करणें शक्तीबाहेरचें आहे. देशांत वाढत असलेल्या दारिद्र्यामुळें होणाऱ्या प्राणहानीचा विचार कांही वेळ सोडून देऊन सांसर्गिक व इतर रोगानें होणाऱ्या मृत्यूसंख्येकडे पाहिलें म्हणजे तेथील सर्व अंधकारच दिसून येतो.

